# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/अभ्या./संस्था बंद/२०१८/ १०६२

दिनांक : 28 AUG 2018

विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था / अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद करण्यास (Progressive Closure) दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत...

उपरोक्त विषयाबाबत असे निदर्शनास आलेले आहे की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था/ अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद करण्यास(Progressive Closureमाहे डिसेंबर, २०१७ मध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने याबाबतचा शासन निर्णय निर्गमित होणे आवश्यक आहे. तथापि, सदर संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था / अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद करण्यास शासन मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव अद्याप पर्यंत या संचालनालयास सादर केलेला नाही.

याबाबत असे नमूद करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून संचालनालयास मान्यतेबाबत एकत्रित यादी ईमेलव्दारे देण्यात येते. त्याअनुषंगाने संचालनालयामार्फत सदर शैक्षणिक वर्षात प्राप्त मान्यतांच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास एकत्रित सादर करण्यात येतो. तद्नंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत संबंधीत संस्थांनी आवश्यक त्रुटींची पुर्तता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे केल्यानंतर संस्थांच्या मान्यतांमध्ये करण्यात येणारे बदल, संस्था / अभ्यासक्रम बंद करणे इ. बाबत संबंधीत संस्थांना संबंधीत शैक्षणिक वर्षाअखेर पर्यंत स्वतंत्रपणे पत्राव्दारे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून कळविण्यात येते. त्याबाबत संचालनालयाशी कोणताही वेगळा पत्रव्यवहार/ ईमेल अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत करण्यात येत नाही. याबाबत संबंधीत संस्थेने सदर बदलाबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याच्या अनुषंगाने संचालनालयास प्रस्ताव सादर केल्यानंतर सदर बाबत संचालनालयामार्फत शासनास प्रस्ताव सादर करणे शक्य होते.

तरी, उपरोक्त विषयाबाबत असे निदर्शनास आलेले आहे की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था/ अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद करण्यास (Progressive Closure) माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत ज्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना/ अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आलेली आहे, तथापि, याबाबतचा शासन निर्णय अद्याप निर्गमित झालेला नाही. अशा संस्थांनी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था/ अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद करण्याबाबत (Progressive Closure) शासन निर्णय निर्गमित होणे करीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेच्या पत्रासह प्रस्ताव या संचालनालयास तात्काळ सादर करावा. संबंधीत संस्थांमार्फत प्रस्ताव सादर न केल्यामुळे शासन निर्णय निर्गमित न झाल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत संस्थांची राहील, याची नोंद घ्यावी.

नागपूर 7400 1 SEP 2018

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई

---

पृष्ठांकन क्रं./तंशिस/विकाना/शै।/पदविका/2018 /2933
दिनांक:- 3 SEP 2018

प्रति,
प्राचार्य
पदविका संस्था नागपूर विभाग,
नागपूर

उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे नागपूर विभागातील पदविका अभ्यासक्रमाच्या संबंधीत संस्थानी तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

(गुणवंतराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर